शिवजयंती, २४ एप्रिल १९९३

दिनांक १९ – जून १९९३.

श्री. मधुकर गायकवाड
केंद्र निदेशक,
आकाशवाणी, मुंबई.

विषय : पोवाडे संवर्धन योजना....

पोवाडे संवर्धन योजनेची सुरवात उपलब्ध असलेल्या सुरवातीच्या पोवाड्यांपासून करणे उचित ठरेल. त्यादृष्टीने आद्यशाहीर अज्ञानदास व तुळशीदास यांच्या 'अफझलखान वध' आणि 'तानाजी मालुसरे' या दोन पोवाड्यांची निवड केली आहे.

हे दोन्ही पोवाडे विस्तृत असल्याने आकाशवाणीसाठी त्यांची संक्षिप्त रुपे केली आहेत. त्यात शक्यतो एकसूत्रीपणा राखण्याचा प्रयत्न केला आहे.

या पोवाड्यांच्या मूळ चाली माहित असणे कठीण आहे. पेशवेकालात त्या लावणीच्या चालीवर म्हणत असल्याचा पुरावा मिळतो. सध्या लावलेल्या चाली सध्या प्रसारात असलेल्या पोवाड्यांच्या चालींवर आधारित आहेत.

प्रत्येक पोवाडा अंदाजे २० मिनिटांचा होईल.

ते योग्य शाहिरांकडून गाऊन घ्यावेत.

सोबत : दोन पोवाडे

आपला विश्वासू

पत्रव्यवहाराचा पत्ता :

डी ८०/७९६ एम आय जी कॉलनी
वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१, (दूरध्वनी : ६४२ २५ २९)

[signature]

( शाहीर प्रभाकर जामदेकर )

AIC
19/7/93
All India Radio
[illegible]
[illegible]

# छत्रपति शिवाजी महाराजांचा पोवाडा
## (अफझलखान वध)

खुद्द शिवचरित्रासंबधी दोनच पोवाडे उपलब्ध आहेत. पहिला अज्ञानदास शाहीराचा "अफझल खान वध" व दुसरा शाहीर तुळशीदासाचा "तानाजी मालुसरा".

हे दोन्ही पोवाडे शिवकालीन समजले जात; परंतु या पोवाड्यांची रचना शिवकालीन आहे की नाही या विषयी शंका आहे. ग. ह. खरे यांनी अज्ञानदासाचा "अफझलखाज वध" हा पोवाडा सन १७०० नंतरचा तर द. वा. पोतदारांनी तुळशीदासाचा "तानाजीचा पोवाडा" पेशवेकालीन ठरविला आहे.

'अफझलखान वध' या पोवाड्याचे हे संक्षिप्त रूप.

# छत्रपति शिवाजी महाराजांचा पोवाडा *
## (अफझलखान - वध -- पोवाडा)
### शाहीर अज्ञानदास

(मूळ पोवाड्याचे संक्षिप्त रूप : शा. प्रभाकर जामखेडकर)

माझे नमन आधी गणा | सकळिक ऐका चित्त देऊन ||
नमियेली सारज्या | त्याली जडिताचे भूषण ||
सद्गुरुच्या प्रसादें | संपूर्ण अंबेचे वरदान ||
गाइन वजिराचे भांडण | भोसल्या सर्जा दलभंजन ||
अज्ञानदास बोले वचन | गाईन राजाचे भांडण ||
देश दुनिया काबिज केली | बारा माऊळे घेतली ||
चंद्रराव कैद केला | त्याची गड जाउली घेतली ||
चेत पाउली काबिज केली | ठाणी राजाची बैसली ||
घेतली जाउली न् माहुली | कल्याण भिवंडी काबिज केली ||
सोडाविले तळकोकण | चेउली ठाणी बैसाविली ||
कुबल, बांकी घरे | शिवराजाच्या हाती आली ||
मुलाना हामाद | फिर्याद बाच्छायाप गेली ||
बाच्छायजादी क्रोधा आली | जैशी अग्न परजळली ||
जित धरावा राजाला | फुलवाजिराला खबर दिली ||
बाच्छाय पाठविले प्रमाण | वजिर बोलावा तमाम ||
बाच्छाय पुसे वाजिराला | धरिसा कोण आहे शिवराजाला ||
बावीस उंबराव आले सभेला | विडा पैजेचा मांडिला ||
सभाई अबदुल्या बोलला | 'जिता पकडूं मैं राजाला' ||
विडा पैजेचा घेतला | तुरा मोत्याचा लाविला ||
तीवरसांची मोहिम | घेऊन अबदुल्या चालला ||
मोठा अपशकुन जाहला | फत्या लसकरा हत्ती मेला ||
खबर गेली बाच्छायाला | बिनीचा हत्ती पाठविला ||
बारा हजार घोडा | अबदुलखानालागी दिला ||
अबदुल आलासे बोलती | धाके गड किल्ले कापती ||
वजीर उंबराव बोलती | 'शिवाजीस गडे कोंडू, म्हणती ||
अबदुल सारा आहे किती | त्याच्या दळाची गणती ||
सांदळी भांडती | मग कणकीला मीठ किती? ||

तेथून कूच केले कटकाला । अबदुल वांई लागी आला ॥
बरेपणाचा कागद । हेजिब महाराप गेला ॥
राजा राउळीत राहिला । हेजिब अबदुल्याचा आला ॥
राजा हेजिबास बोलतो । "खंड मला काय मागतो ॥
चउआगळे चाळीस गड । मी अबदुलखानालागी देतो ॥
मजवर कृपा आहे खानाची । जावलीत सदा सवारितो ॥
तेथे यावे भेटायाला । मी खानाची वाट पाहतो" ॥
हेजिब तेथुनि निघाला । अबदुलखानाजवळ आला ॥
अबदुल पाहतो वाचुन । "खुंटले गनिमाचे मरण" ॥
हाती आले गड किल्ले । खुशी जाहला अबदुलखान ॥
राजांनी सदरा सजविल्या । हेजिब अबदुल्यास धाडिला ॥
मोरो ब्राह्मण पाठविला । अबदुलखानासी बोलविला ॥
"चार हजार घोडा । कोण्या कामास्तव आणिला ?' ॥
त्याने बाहेर निराळा ठेविला । दहा पांचांनिशीं चालिला ॥
"एकांतीच्या गोष्टी । तेथे दहा पांच कशाला ॥
पालखी दुर करा भोईयाला" । खासा अबदुल चालला ॥
"हात चालावा व्हा । दुर करा" म्हणे खानाला ॥
वस्त्रे केली हेजीबाला । शामराज नवाजीला ॥
भवानीशंकर प्रसन्न ज्याला । तुळजा मदत शिवराजाला ॥
भोग पुरला खानाचा । अबदुल जावळीत आला ॥
बिनहत्याराविण मोकळा । अबदुल सदरेलागी आला ॥
सदर देखुनि सुरवी झाला । "ऐशी सदर नाही अवरंगशा
बाच्छायाला ॥
अबदुलखान बोलिला । "शिवाजीस आणा भेटायाला" ॥
राजा नवगजीत बैसला । मोरो, शाम बोलाविला ॥
रघुनाथ पेशवे । नारो शंकर पाचारिला ॥
दहातोंड्या माणकोजीला । त्या इंगळ्या सुभानजीला ॥
देबकांत्या जीवाजीला । राजाने बोलाविले तुम्हाला ॥
करनरवऱ्या सुभानजीला । बेलदारा ग्पिलाजीला ॥
त्या बोबड्या बहिरजीला । सरदार आले भेटायाला ॥

| | |
|---|---|
| राजा विचारी भल्या लोकांला | "कैसे जावे भेटायाला" |
| बंककर कृष्णाजी बोलला | "शिवबा सील करा अंगाला" |
| भगवंताची सील ज्याला — | आतुन बारिक झगा त्याला |
| मुसेनरीच्या सुरवारा | सरजा बंद सोडुन दिला |
| डावे हाती बिचवा त्याला | वाघनख सरज्याच्या पंजाला |
| पटा जीव म्हालयाप दिला | सरजा बंद सोडुन चालिला |
| 'माझा राम राम दादानु" | गडच्या गडकरा बोलिला |
| खबर गेली जिजाऊला | शिवबा जातो भेटायाला |
| पालखीत बैसूनी | माता आली भेटायाला |
| शिवबा बोले जिजाऊ सवे | "बये वचन ऐकावे |
| माझी आसोशी खानाला | "बये जातो भेटायाला |
| जिजाऊ बोले महाराजाला | "शिवबा बुद्धिने काम करावे |
| | उसने संभाजीचे घ्यावे" |
| ध्यानी आठवून भगवंताला | शिवाजी राजा सदरे गेला |
| "पहिला सलाम | माझा भवानीशंकराला |
| दुसरा सलाम | माझा शहाजी महाराजाला |
| तिसरा सलाम | अमचे अबदुलखानाला" |
| शिवाजी सरजे सलाम केला | अबदुलखाने गुमान केला |
| मनी धरले कपट | पुरते कळले महाराजाला |
| मग तो शिवाजी सरज्याला | खान दापुनी बोलला |
| "तूं तो कुणबीका छोकरा | सवरत बाच्छाई सदरा" |
| इतक्या उपरी राजा बोले | त्या अबदुलखानाला |
| "खाना ज्याची करणी त्याला | काहीएक भ्यावे रघुनाथाला |
| तुम्ही जातीचे कोण | आम्ही जाणतो तुम्हाला |
| तूं तरी भटारनीका छोरा | शिवाजी सरज्यापर लाया तोरा" |
| यावर अबदुल बोलला | "शिवा तुम चलो विजापुराला" |
| "शिवाजी सरजे नेता | बहुत दिन लागतील खानाला |
| कळला पुरुषार्थ | तुमचा बसल्या जागेला |

इतकिया उपरी | अबदुल मनी खवळला पुरा ||
कव मारिली अबदुल्याने | सरज्या गवसून धरला सारा ||
चालविली कट्यार | सीलवर मारा न चाले जरा ||
सराइत शिवाजी | त्याने बिचव्याचा मारा केला ||
उजवे हाती बिचवा त्याला | वाघनख सरजाच्या पंजाला ||
उदरची फाडुनी | खानाची चरबी आणिली द्वारा ||
खान "लव्हा लव्हा" बोलिला | खानाचा लव्हा बेगिन आला ||
राजाने पट्टा पडताळिला | अबदुलखानाने हात मारिला ||
शिरींचा जिरेटोप तोडला | सरजा (लो) जरासा लागला ||
भला सराईत शिवाजी | पट्ट्याचा गुंडाळा मारिला ||
मान खांदा गवसुनी | जानव्याचा दोरा केला ||
अबदुलखान शिवाजी | भांडती दोघी धुरा ||
बारा हजार घोडा | सरदार नाही कोणी तिसरा ||
अबदुलखान झाला पुरा | कृष्णाजी ब्राह्मण उठावला ||
शिवाजी राजा बोलला | तुगशी मारता शंकर हासेल आम्हाला ||
कृष्णाजी ब्राह्मण मागे सरला | सैद बंडु मोहरे आला ||
जवळ होता जिऊ म्हाल्या | त्याने सैद पुरा केला ||
संशय खानाचा फिटला | खान पळता पाय काढला ||
मेळविला भोयांनी | पालखीत घालून चालविला ||
कावजीचा संभाजी भोसला | मोठे उडीने आला ||
जखमा केल्या भोयांच्या पायां | खटारा धरणीवर पाडिला ||
शिवाजी राजा बेगिन आला | शिर कापुनी गडावर गेला ||
जराचाच मंदिल | शिरीं त्या संभाजीच्ये घातला ||
फाजिलखाना धावा आर्ले | बाण आणि बंदुखा धीर वर्षाव एकच केला ||
शिवाजी राजाचा चपाटा | फाजिलखान बारा वाटा ||
हाल महाराजाचे झाले | अबदूलच्या लोकाला ||
पळता फाजिलखान | त्याचा दुमाला घेतला ||
घोडा आणि राऊत | त्यांनी पाडाव केला ||
वळत्या हातीवरल्या ढाला | चार हजार घोडा अबदुल्या जावळीत बुडविला ||

सरज्या तोरड । महिमोर्तब शिवाजीला ॥
फत्ते झाली महाराजाची । ते वेळ पन्हाळा घेतला ॥
॥

अज्ञानदास विनवी श्रोत्याला । राजा अवतारी जन्मला ॥
नळनीळ सुग्रीव जांबुवंत । अंगद हनुमंत रघुनाथाला ॥
एकांती भांडन । जैसे रामरावणाला ॥
तैसा शिवाजी सरजा । एकांती आटोपे कवणाला ॥
दृष्टी पर्यंत शिवाजीला । कली मधी अवतार जन्मला ॥
जिकडे जाती तिकडे । यश राज्याच्या खंडाला ॥
माता जिजाऊ बोलली । पोटी अवतार जन्मला ॥
धन्य जिजाऊचे ~~पोटी~~ कुशी । राजा अवतार जन्मला ॥
आपल्या मतें अज्ञानदासाने । वीरमाळ राज्याचा गाइला ॥
शिवाजी सरज्याने । इनाम घोडा बक्षिस दिला ॥
शेरभर सोन्याचा । तोडा हातात घातला ॥
यश जगदंबेचे । तुळजा प्रसन्न शिवरायाला ॥